# पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग

टिळक रोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड-४०२२०१
दुरध्वनी कमांक-०२१४१-२२८४७३ ई-मेल - sp.raigad@mahapolice.gov.in


## रायगड जिल्हा पोलीस शिपाई चालक भरती सन २०२१
## लेखी परीक्षा संबंधी सर्वसाधारण सुचना

-----ooo-----

रायगड जिल्हा पोलीस शिपाई चालक पदाकरीता दिनांक २६/०३/२०२३ रोजी लेखी परीक्षे घेण्यात आलेली असुन सदर परीक्षेची तात्पुरती उत्तरतालिका दिनांक २६/०३/२०२३ रोजी रायगड जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यामध्ये दिनांक २७/०३/२०२३ रोजी १०.०० वाजेपर्यंत ई-मेलव्दारे आक्षेप पाठविण्याबाबत प्रसिध्द करण्यात आले होते. त्यामध्ये एकुण १६ प्रश्नांकरीता २० उमेदवारांमार्फत आक्षेप नोंदविण्यात आलेले असुन सदर आक्षेपांचे निरसन खालील प्रमाणे करण्यात येत आहेत.

---

प्रश्न १) एका चौकोनाच्या चार कोनांच्या मापांचे प्रमाणे 2:3:3:2 आहे, तर तो चौकोन पुढील पैकी कोणता ?

पर्याय :- A) आयत B) चौरस C) समलंब चौकोन D) पतंग

आक्षेप :- उत्तर आयत हे सुध्दा येत आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक C हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न २ ) ध्वनीचा वेग खालीलपैकी कोणत्या पदार्थामध्ये जास्त असतो ?

पर्याय :- A) पोलाद ( स्टिल ) B) ॲल्युमिनीअम C) लोखंड D) फ्लिट काच

आक्षेप :- पोलाद ( स्टिल ) बरोबर आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक B हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न ३ ) मी डोळस असुनही अंधच हाय करंटा।ऐकू न ये जरी गभीर वाजे घंटा ॥

पर्याय :- A) विभावना B) विशेषोक्ती C) विरोधाभास D) असंगती

आक्षेप :- याप्रश्नाचे योग्य उत्तर पुस्तकात पर्याय कमांक C विरोधाभास असा आहे .

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक B हे उत्तर बरोबर आहे.**

पोलीस अधिक्षक

प्रश्न ४ ) खालील शब्दाशी लागू पडणारा पर्याय निवडा ?

**प्रयोजक**

पर्याय :- A) लेखन करणारी व्यक्ती B) प्रयोग करणारी व्यक्ती

C) प्रोत्साहन देणारी व्यक्ती D) वाचन करणारी व्यक्ती

आक्षेप :- प्रयोजक म्हणजे प्रोत्साहन देणारी व्यक्ती, प्रयोग करणारी व्यक्ती हे उत्तर चुक आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक C हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न ५) खाली दिलेल्या वाक्यप्रचाराचा अर्थ असलेला पर्याय निवडा.

**उपर ठेवणे**

पर्याय :- A) मदत करणे B) त्रास होणे C) वरचष्मा राखणे D) वरील पैकी नाही.

आक्षेप :- उपर ठेवणे म्हणजे जाण ठेवणे असा अर्थ होतो. परंतु, उत्तरमध्ये वरचष्मा राखणे असा दिला आहे तो चुक आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक C हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न ६ ) ' तमोगुण ' या शब्दाची फोड कोणती ?

पर्याय :- A) तम+गुण B) तमा+गुण C) तमः+गुण D) तमो+गुण

आक्षेप :- तमोगुण याची योग्य संधी विसर्ग संधी होय ती पुढील प्रमाणे.. **तमः+गुण**

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक C हे उत्तर बरोबर आहे.**

---

पोलीस अधिक्षक
सत्यमेव जयते
रायगड - अलिबाग

प्रश्न ७ ) नदीच्या <u>काठाने</u> गावे वसतात ( अधोरेखित शब्दाचा कारकार्थ ओळखा )

पर्याय :- A) करण B) कर्म C) संप्रदान D) अधिकरण

आक्षेप :- काठाने या शब्दाला 'ने' असा प्रत्येय लागला आहे, ने, ए, शी ही तृतीया विभक्ती आहे आणि या तृतीय विभक्ती चा कारकार्थ हा 'करण' पर्याय कमांक A हे उत्तर योग्य आहे आणि अधिकरण हे चूक आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक D हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न ८ ) पोल्युशन अंडर कंट्रोल ( PUC ) सर्टिफिकेट याप्रमाणपत्राची वैधता किती दिवस असते ?

पर्याय :- A) सहा महिने B) एक वर्ष C) दोन वर्ष D) वाहनांच्या वैधतेपर्यंत

आक्षेप :- सहा महिने असे योग्य उत्तर RTO पाठयपुस्तकात दिले आहे.

**स्पष्टीकरण :- सदर प्रश्नाचे एका पेक्षा जास्त पर्याय बरोबर असल्याने, सर्व उमेदवारांना गुण देण्यात येत आहेत.**

---

प्रश्न ९ ) जर रस्त्यावर सलग पिवळया रेषेने मार्कींग केली असेल तर त्याचा अर्थ काय असतो ?

पर्याय :-
A) पिवळया रेषेला स्पर्श करु नये किंवा ओलांडू नये
B) या रस्त्यावर फक्त पिवळया नंबर प्लेट असणारी मोटार वाहने चालू शकतील.
C) पिवळया रेषेवर पार्कींग करु शकता.
D) या रेषेच्या पलिकडून खबरदारीने समोरील वाहनास ओलांडू शकता.

आक्षेप :- योग्य उत्तर पिवळया रेषेला स्पर्श करु नये किंवा ओलांडू नये असे RTO पाठयपुस्तकात दिले आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक A हे उत्तर बरोबर आहे.**

---

पोलीस अधिक्षक
सत्यमेव जयते
रायगड - अलिबाग

प्रश्न १० ) मोटार ड्रायव्हींग लायसन्स शिवाय मोटार वाहन चालविणे यासाठी कोणत्या कलमाप्रमाणे दंड/शिक्षा होते ?

पर्याय :- A) कलम १८४ मो.वा.कायदा १९८८ B) कलम १८१ मो.वा.कायदा १९८८

C) कलम १०० मो.वा.कायदा १९८८ D) यापैकी नाही

आक्षेप :- योग्य उत्तर RTO पाठयपुस्तकात मोटार वाहन कायदा १९८८ नुसार कलम १८० हे आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक B हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न ११ ) या चिन्हाचा अर्थ काय होतो ?



पर्याय :-

A) मोठा रस्ता पुढे आहे B) पुढे क्रॉस रोड नाही.

C) पुढे अडथळा आहे. D) खडबडीत रस्ता

आक्षेप :- उत्तर बरोबर करावीत.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक A हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न १२) कांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचे मूळ गाव कोणते ?

पर्याय :-

A) दुरशेत B) शिरढोण C) कामशेत D) वडखळ

आक्षेप :- कांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचे मूळ गाव रायगड जिल्हयातील शिरढोण हे आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक B हे उत्तर बरोबर आहे.**

प्रश्न १३) एका त्रिकोणाच्या दोन बाहय कोनांची मापे अनुक्रमे १४०° व १३०° आहेत, तर तो त्रिकोण कोणत्या प्रकारचा त्रिकोण आहे ?

पर्याय :-

A) लघूकोन त्रिकोण B) विशालकोन त्रिकोण
C) काटकोन त्रिकोण D) समभुज त्रिकोण

आक्षेप :- उत्तर बरोबर करावीत.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक C हे उत्तर बरोबर आहे.**

---

प्रश्न १४) मोटर वाहन रजिस्ट्रेशन मध्ये **BH** सेरीज नंबर प्लेट ही पहिल्यांदा कोणत्या राज्यात सुरु झाली ?

पर्याय :- A) दिल्ली B) राजस्थान C) महाराष्ट्र D) केरळ

आक्षेप :- **BH** सेरीज पहिल्यांदा उत्तर प्रदेश याठिकाणी सुरु झाली आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक C हे उत्तर बरोबर आहे.**

---

**प्रश्न १५ )** एम.एच. 47 या प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय कोठे आहे ?

पर्याय :- A) कराड B) मालेगाव C) मुंबई D) श्रीरामपूर

आक्षेप :- **MH47** हा बोरीवली हया प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा असून आपण आपल्या पर्यायामध्ये तसे नमुद केलेले नाही.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक C हे उत्तर बरोबर आहे.**

---

पोलीस अधिक्षक
सत्यमेव जयते
रायगड - अलिबाग

**प्रश्न १६** ) वाहनांच्या बाबतीत वापरले जाणारे **BS-6** हे मानक/संज्ञा कशाशी संबंधीत आहे ?

पर्याय :- A) वाहनांच्या मॉडेलची आधुनिकता B) वाहनांच्या इंजिनचा प्रकार

C) वाहनांमध्ये असणा-या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा दर्जा D) वाहनातून निघणारे उत्सर्जन

आक्षेप :- उत्तरे चुकीची आहेत.

स्पष्टीकरण :- **पर्याय कमांक D हे उत्तर बरोबर आहे.**

---

पोलीस अधिक्षक

सत्यमेव जयते

रायगड - अलिबाग